HSIL

**PRESS MONITOR**

Publication : Aadarsha Maharashtra
Edition : Mumbai
Date : March 06, 2018

# मूनबोने लॉंच केला, पाण्यातील टीडीएस पातळी कमी असलेल्या भागांसाठी, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने प्रगत अल्फीअस यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर

## एक लिटर पाण्यातून १०० कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता
## स्टेनलेस स्टीलच्या यूव्ही स्टरलायझरवर कायमस्वरुपी वॉरंटी

नवी दिल्ली, (कौशिक मायकानी) : मूनबोने भारतातील सर्वात शक्तिशाली यूव्ही वॉटर प्युरिफायर्समधील अल्फीअस यूव्ही + यूएफ हा वॉटर प्युरिफायर लॉंच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. १,४९०/- रुपये किंमतीच्या या वॉटर प्युरिफायरला टीयूव्ही या जगविख्यात जर्मन प्रमाणीकरण प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ॲल्युमिनिअमपासून तयार करण्यात आलेला सामान्य वॉटर प्युरिफायर एक लिटर पाण्यातून एक कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढू शकतो, तर अल्फीअसमध्ये एक लिटर पाण्यातून १०० कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता आहे. पाण्यामध्ये विरघळलेल्या एकूण घनपदार्थांची पातळी (टीडीएस पातळी) कमी असलेल्या भौगोलिक प्रदेशांसाठी अल्फीअस यूव्ही + यूएफ विशेषत्वाने तयार करण्यात आला आहे. कारण, अशा भागांत आरओ शुद्धीकरणामुळे पेयजलातील अत्यावश्यक क्षार नष्ट होतात आणि ते पाणी अनारोग्यकारक होते.

आरओ आधारित वॉटर प्युरिफायर्स पाण्यातील जड धातू आणि अन्य अशुद्ध घटकांसह अत्यावश्यक क्षारही पाण्यातून वेगळे काढतात. त्यामुळे टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्याचा पुरवठा होणाऱ्या भागात क्षार संरक्षण (मिनरल फोर्टिफिकेशन) तंत्रज्ञान नसलेले आरओ वॉटर प्युरिफायर्स वापरले जातात, तेव्हा शुद्ध केलेल्या पाण्यातील क्षारांचे प्रमाण मानवी शरीराला आवश्यक प्रमाणाच्या तुलनेत कमी भरते. याउलट, यूव्ही वॉटर प्युरिफायर्समध्ये टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्यातील सर्व आवश्यक नैसर्गिक क्षार कायम राखत अशुद्ध घटक काढून टाकण्याची क्षमता असते. यूव्हीला (अल्ट्रा व्हॉयलेट) यूएफची (अल्ट्रा फिल्ट्रेशन) जोड मिळाल्यास जीवाणू आणि पाण्यातील अन्य अशुद्ध घटकांपासून अतिरिक्त संरक्षण मिळते. म्हणूनच पाण्यातील टीडीएस पातळी कमी आहे अशा शहरांसाठी यूव्ही + यूएफ वॉटर प्युरिफायर आदर्श आहे.

एचएसआयएल लिमिटेडचे अध्यक्ष आणि ग्राहकोपयोगी उत्पादन विभागाचे प्रमुख राकेश कौल म्हणाले, 'औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांचा परिणाम म्हणून जलप्रदूषणाच्या पातळीत अत्यंत गतीने वाढ झाली आहे आणि त्यामुळे पाण्याद्वारे होणाऱ्या आजारांचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत वॉटर प्युरिफायर ही मूलभूत गरज झाली आहे. याचा परिणाम म्हणून भारतातील वॉटर प्युरिफायर्सची बाजारपेठ आज ४५०० कोटी रुपयांची आहे आणि त्यात २० टक्क्यांनी वाढ होणे अपेक्षित आहे.'

ते पुढे म्हणाले, 'ग्राहकांना बहुतेकदा असे वाटते की आरओ वॉटर प्युरिफायर्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. खरे तर प्रत्येकाने वॉटर प्युरिफायर खरेदी करण्यापूर्वी पाण्यातील टीडीएसची पातळी तपासून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणे वॉटर प्युरिफायर निवडला पाहिजे. पाण्यातील टीडीएस पातळी कमी आहे अशा भागात यूव्ही वॉटर प्युरिफायर्स सर्वाधिक अनुकूल आहेत. कारण, ते पाण्यातील नैसर्गिक क्षारांचे प्रमाण कायम राखण्यात मदत करतात. याउलट पाण्यातील टीडीएस पातळी उच्च आहे अशा भागांसाठी मिनरल फोर्टिफिकेशन तंत्रज्ञानयुक्त आरओ वॉटर प्युरिफायर अनुकूल आहेत. अल्फीअस यूव्ही+ यूएफ बाजारात दाखल झाल्यामुळे वॉटर प्युरिफायर्समधून आम्हाला मिळणारे उत्पन्न वाढेल आणि २०२१ पर्यंत आम्ही देशातील पहिल्या तीन कंपन्यांमध्ये येऊ शकू, अशी अपेक्षा आहे. केवळ अतिशुद्ध पाणी नव्हे, तर क्षारसमृद्ध आरोग्यपूर्ण पेयजल देणे हे मूनबोचे उद्दिष्ट आहे. आमच्या मिनरल फोर्टिफिकेशन, टेक्नाप्युअर आणि डिजिसेन्स या आधुनिक युगातील प्रगत तंत्रज्ञानामुळे आम्हाला भारतीय बाजारपेठेतील वॉटर प्युरिफायर्सच्या ब्रॅन्ड्सच्या तुलनेत एक पाऊल पुढे टाकणे शक्य झाले आहे.'



सिंगल बॉडी स्टेनलेस स्टीलचा यूव्ही स्टरलायझर असलेला हा वॉटर प्युरिफायर सध्या अस्तित्वात असलेल्या ॲल्युमिनिअम बॉडी असलेल्या यूव्ही वॉटर प्युरिफायर्सच्या तुलनेत खूपच चांगला आहे. स्टेनलेस स्टीलच्या यूव्ही स्टरलायझरमुळे वॉटर प्युरिफायरची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे आणि सिंगल बॉडीमुळे स्टरलायझरमधून यूव्ही किरणांची गळती होण्याची शक्यता पूर्णपणे नाहीशी झाली आहे. शिवाय ॲल्युमिनियम बॉडीमुळे ॲल्युमिनियम व जस्तासारख्या जड धातूंचा अनारोग्यकारक स्पर्श पाण्याला होतो. हे स्टील बॉडीमुळे पूर्णपणे टाळले जाते आणि १०० टक्के शुद्ध व आरोग्यपूर्ण पाणी मिळते. वॉटर प्युरिफायरची रचना शैलीदार व आटोपशीर असून, वापरकर्त्यांच्या सोयीचा इंटरफेस आहे. पॉवर, टँक फुल, फेल्युअर अॅलर्ट आणि फिल्टर बदलण्याचे निदर्शक यावर आहेत.

मूनबो अल्फीअस यूव्ही ६ यूएफने आपल्या स्टेनलेस स्टीलच्या यूव्ही स्टरलायझरवर कायमस्वरुपी वॉरंटी दिली आहे. यामुळे या उत्पादनाच्या कामगिरीबद्दल ग्राहकांना अधिक विश्वास वाटेल. कारण, सध्या बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या वॉटर प्युरिफायर्समधील यूव्ही चेंबरवर केवळ एक वर्षाची वॉरंटी आहे.

हिंडवेअर या सॅनिटरी वेअरच्या ब्रॅन्डनंतर आता एचएसआयएलने पाणी शुद्धीकरण क्षेत्रात प्रवेश केला आहे. २०१६ सालच्या मध्यात कंपनीने मूनबो वॉटर प्युरिफायर्स बाजारात आणले. आज या ब्रॅन्डची सहा वेगवेगळी मॉडेल्स उपलब्ध असून त्यांच्या किंमती १,४९०/- ते २४,९९०/- रुपये यांदरम्यान आहेत. भारतभरातील महत्त्वाच्या रिटेल दुकानांमध्ये मूनबोचे वॉटर प्युरिफायर्स उपलब्ध आहेत.